# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दूरध्वनी क्रमांक 02472-227301

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 24 फेब्रुवारी 2021.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 01 मार्च 2021.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 10/03/2021.

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 मधील महाराष्ट्र शासनाचे आदेशानुसार संदर्भ क्र. 5 अन्वये उस्मानाबाद जिल्ह्यात लॉकडाऊनचा कालावधी दि. 31 मार्च 2021 पर्यंत वाढविण्यात आला आहे. ज्याअर्थी उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये दिवसेंदिवस कोविड-19 च्या रुग्णसंख्येत वाढ होताना दिसत असून कोविड-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा एक भाग म्हणून उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये काही निर्बंध लागू करणे अगत्याचे झाले असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2, 3 अन्वये व फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार **उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये दि. 12.03.2021 पासून पुढील आदेशापर्यंत खालीलप्रमाणे निर्बध लागू करण्याबाबत आदेश पारित करीत आहे.**

1. उस्मानाबाद जिल्ह्यातील **सर्व आठवडा बाजार पुढील आदेशापर्यंत बंद** करण्यात येत आहेत.
2. संपूर्ण उस्मानाबाद जिल्ह्यात पुढील आदेशापर्यंत **दर रविवारी जनता कर्फ्यूचे पालन करण्यात यावे.** यादिवशी सर्व दुकाने, बाजारपेठा बंद राहतील. तथापि रुग्णालयाशी संलग्न असलेले मेडिकल्स चालू ठेवता येतील.
3. उस्मानाबाद जिल्ह्यातील **सर्व धार्मिक स्थळे/प्रार्थनास्थळे/मंदिरे पुढील आदेशापर्यंत दर रविवारी बंद राहतील.**
4. धार्मिक विधींमध्ये पाच पेक्षा अधिक व्यक्तींना उपस्थित राहण्यास परवानगी असणार नाही. तसेच धार्मिक स्थळे/प्रार्थनास्थळे याठिकाणी **"नो मास्क नो एन्ट्री"** नियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.
5. जिम, व्यायामशाळा, स्पोर्टस कॉम्प्लेक्स, खेळाची मैदाने, स्विमिंग टॅंक हे **50 % क्षमतेने वैयक्तिक सरावासाठी** चालू ठेवण्यास परवानगी राहील. याठिकाणी सामाजिक अंतराचे पालन करणे अनिवार्य राहील. स्पोर्टस कॉम्प्लेक्स, खेळाची मैदाने, स्विमिंग टॅंक याठिकाणी **मोठ्या स्पर्धा आयोजित करण्यास व प्रेक्षकांना उपस्थित राहण्यास परवानगी असणार नाही.** जिम, व्यायामशाळा, स्पोर्टस कॉम्प्लेक्स, खेळाची



Scanned by CamScanner

मैदाने, स्विमिंग टँक येथे तपासणीमध्ये 50 % क्षमतेचे व कोविड-19 च्या प्रतिबंधासाठी शासनाने घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास ती जिम, व्यायामशाळा, स्पोर्टस कॉम्प्लेक्स, खेळाची मैदाने, स्विमिंग टँक तात्काळ बंद करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

6. सर्व सामाजिक/राजकीय/क्रीडा/मनोरंजन/शैक्षणिक/सांस्कृतिक/धार्मिक कार्यक्रम व इतर सभा संमेलने/उपोषण/आंदोलने/निदर्शने/मोर्चा इ. यांना पुढील आदेशापर्यंत मनाई राहील.
7. भाजीमंडईमध्ये सामाजिक अंतराचे पालन होईल याअनुषंगाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.
8. दि. 15.03.2021 पासून उस्मानाबाद जिल्ह्यातील **सर्व मंगल कार्यालये, फंक्शन हॉल्स, लॉन्स पुढील आदेशापर्यंत बंद राहतील.**
9. उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व नगर परिषद/नगर पालिका/नगर पंचायतींच्या हद्दीमध्ये आज दि. 10.03.2021 पासून पुढील आदेशापर्यंत रात्री 9 ते पहाटे 5 या कालावधीत रात्रीची संचारबंदी (NIGHT CURFEW) राहील. या कालावधीत **सर्व अत्यावश्यक बाबी (आरोग्य विषयक सुविधा, प्रवासी वाहतूक) वगळून व्यक्तींच्या हालचालींना कडक प्रतिबंध राहील.**

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 ते 60, महाराष्ट्र कोविड उपाययोजना नियम 2020 चे नियम 11, साथरोग अधिनियम 1897 तसेच भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 व इतर लागू होणा-या कायदेशीर तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश आज दि. 10/03/2021 रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी देण्यात आला आहे.

(कौस्तुभ दिवेगावकर)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
5. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद.
6. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.
7. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
8. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
9. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
10. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
11. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
13. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद/नगर पालिका/नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
14. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner